पुढारी पृ. पान क्र. ५ दि. 05/05/2023

# सीसीटीव्हीसाठी मिळणार १७५ कोटींचा निधी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर शहरातील सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी पालिकेला १७५ कोटींच्या निधीची आवश्यकता होती. यासाठी आ. गिता जैन यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ३ मे रोजी भेट घेत त्या निधीला मान्यता दिल्याची माहिती जैन यांनी दिली.

पालिकेने भाईंदर पश्चिमेकडील भारतरत्न स्व. इंदिरा गांधी उड्डाण-पूलाखाली निर्माण केलेल्या सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाचे लोकार्पण २२ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी बोलताना उपमुख्यमंत्र्यांनी लोकार्पण झालेल्या सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाला फिडींगची आवश्यकता असून त्यासाठी संपूर्ण निधी देण्याचे आश्वासन दिले. यासाठी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी राज्य शासनाकडे अनेकदा पत्रव्यवहार केला. दरम्यान पालिकेने २२ एप्रिल रोजी लोकार्पण झालेल्या सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाला शहरातील बहुतांशी सीसीटीव्ही कॅमेरे जोडले असून काही भागांमध्ये अद्याप सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बाकी आहेत. तसेच नियंत्रण कक्षाला फिडींग कनेक्शन देण्याची आवश्यकता असल्याने पालिकेला १७५ कोटींची निधी आवश्यकता असल्याने तसे उपमुख्यमंत्र्यांनी २२ एप्रिल रोजीच्या लोकार्पणावेळी स्पष्ट केले होते. यानुसार जैन यांनी उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने ३ मे रोजी उपमुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यावेळी पार पडलेल्या चर्चेत जैन यांनी सुरक्षेच्या दृष्टीने शहरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्याला प्रतिसाद देत निधी देण्यास मान्यता दिल्याची माहिती जैन यांनी दिली.

पुण्यनगरी पृ. पान क्र. ४

# १५ जूनपर्यंत पश्चिम रेल्वेच्या कारवाईला स्थगिती

**नालासोपारा :** विरार पूर्वेच्या जीवदानी पाडा, अण्णापाडा, रेल्वे क्वारी परिसरात पश्चिम रेल्वेतर्फे केल्या जाणाऱ्या तोडक कारवाईला पुन्हा मुंबई उच्च न्यायालयाने १५ जूनपर्यंत स्थगिती दिली आहे. यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

विरार पूर्वेला रेल्वेच्या जागेत ४० वर्षांहून अधिक काळापासून सुमारे ३००० लोकवस्ती आहे. पश्चिम रेल्वेच्या वतीने अचानक घरांवर तोडक कारवाई करण्याच्या नोटिसा पाठवल्या होत्या. २५ ते २९ एप्रिल तोडक कारवाई केली जाणार होती; पण सामाजिक कार्यकर्ता प्रेसनजीत इंगळे यांनी पहिल्या दिवसापासून फुले आंबेडकर झोपडपट्टी बचाव संघर्ष समितीच्या माध्यमातून कारवाईविरोधात मुंबई उच्च न्यायालयाचा धाव घेतली. न्यायालयाने ४ मेपर्यंत कारवाईला स्थगिती दिली होती. ४ मे रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने पुन्हा फुले आंबेडकर झोपडपट्टी बचाव संघर्ष समितीच्या बाजूने निकाल देत १५ जूनपर्यंत कारवाई स्थगित करण्याचे आदेश न्यायमूर्ती श्रीराम आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या संयुक्त खंडपीठाने दिले आहेत. फुले आंबेडकर झोपडपट्टी बचाव संघर्ष समितीच्या वतीने ॲड. किशोर पाटील, ॲड. दिलीप शिंदे, ॲड. नितीन भोईर यांनी न्यायालयासमोर बाजू मांडली. या सर्व प्रकरणात आ. हितेंद्र ठाकूर, माजी नगरसेवक महेश पाटील, प्रफुल्ल साने, नरेंद्र पाटील हे रहिवाशांना सहकार्य करत असल्याचे प्रेसनजीत इंगळे यांनी सांगितले.

## मारहाण करणाऱ्या कर्मचाऱ्याला अटक

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिम परिसरातील बेकरी गल्लीजवळ सोमवारी सकाळी एका केळी विक्रेत्याला सफाई कर्मचाऱ्याने केळीचे पैसे मागितले म्हणून मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमावर व्हायरल होत आहे. मारहाण करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्याविरुद्ध भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यास अटक केली आहे. मीरा-भाईंदर महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्याने भाईंदर पश्चिमेच्या बेकरी गल्लीत केळीवाल्याकडून केळी घेतली. त्याने केळीचे पैसे मागितले. याचा कर्मचाऱ्याला राग आल्याने तो केळी विक्रेत्याला मारहाण करू लागला. काही नागरिकांनी मध्यस्थी करत मारहाण थांबवली. त्याचा व्हिडिओ समाजमाध्यमावर व्हायरल झाल्यानंतर सफाई कर्मचारी मारहाण करताना दिसत आहे.

Scanned with CamScanner

दि.05/05/2023

लोकमत पू.पान क्र.4

# तत्कालीन भाजपचे बेकायदा ठराव सरकारने केले स्थगित

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेतील तत्कालीन सत्ताधारी भाजपने बहुमताच्या जोरावर परस्पर ६१८ कोटी ४९ लाखांची कामे व नगरसेवक निधीत केलेली १० कोटींची वाढ ही व्यापक लोकहिताची नसल्याचा राज्य सरकारने ठपका ठेवत स्थगित केले आहे. त्यामुळे तत्कालीन सत्ताधारी भाजपच्या मनमानी व नियमबाह्य कारभारावर शासनाने पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे.

मीरा भाईंदर महापालिकेचा २०२२-२०२३ चे मूळ अंदाजपत्रक प्रशासनाने गेल्या वर्षी स्थायी समितीस सादर केले होते. स्थायी समितीने त्यात काही फेरबदल करत १४ मार्च २०२२ रोजी त्यास मंजुरी दिली. तत्कालीन सत्ताधारी भाजपच्या नगरसेवकांनी ३० मार्च २०२२ रोजीच्या विशेष महासभेत मोठ्या प्रमाणात फेरबदल करून अंदाजपत्रक मंजुरीचा ठराव केला होता. त्या ठरावात भाजपच्या तत्कालीन नगरसेवकांनी प्रशासनाने कोणतीही कामांची यादी दिली नसताना परस्पर नियमबाह्यपणे तब्बल ११४ कामांची व ६१८ कोटी ४९ लाख रूपये खर्चाची कामे ठरवत घुसवून बहुमताच्या बळावर मंजूर केली होती. त्याशिवाय नगरसेवक स्वेच्छा निधी शासन निर्णयनुसार महसुली उत्पन्नाच्या २ टक्का असणे बंधनकारक असल्याने तो निधी १५ कोटी ठेवायला हवा होता. परंतु सत्ताधारी यांनी तो निधी १० कोटींनी वाढवून तब्बल २५ कोटी केला होता. इतक्या मोठ्या रकमेची कामे काढण्यासाठी भाजपच्या नगरसेवकांनी पालिकेच्या उत्पन्नाचा फुगादेखील तब्बल २४ ते ६५ टक्क्यांनी फुगवला होता.

## पालिका आयुक्तांचा पाठपुरावा



- आयुक्त दिलीप ढोले यांनी, महासभेने केलेल्या ठरावातील ६१८ कोटी ४९ लाखांची ११४ कामांची यादी व नगरसेवक निधीतील १० कोटींची वाढीचा मुद्दा विखंडित करण्याची विनंती राज्य सरकारला ३ जून व ५ जुलै २०२२ रोजीच्या पत्रान्वये केली होती. महासभेने भरघोस वाढ केल्याने संपूर्ण अर्थसंकल्प कोलमडण्याची भीती आयुक्तांनी व्यक्त केली होती.
- आयुक्तांच्या पत्रानुसार शासनाच्या नगर विकास विभागाने ३ मे २०२३ रोजी आदेश काढून महासभेचा ठराव अंशतः विखंडित केला आहे . यावर सचिव प्रतिभा पाटील यांनी राज्यपालांच्या आदेशानुसार महासभेच्या त्या ठरावातील ६१८ कोटी ४९ लाखांची ११४ कामांची यादी व नगरसेवक निधीची २५ कोटींची केलेली तरतूद महापालिकेच्या आर्थिक तसेच व्यापक लोकहिताच्या विरुद्ध असल्याने विखंडित केल्याचे स्पष्ट केले आहे.

लोकमत पू.पान क्र.1

# केस मागे घेण्यासाठी महिलेस धमकावले

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदरच्या उत्तन येथील मीरा रेसिडेन्सीमधील महिलेला केस मागे घेण्यासाठी धमकाविल्याप्रकरणी भाईंदर पोलिसांनी या प्रकरणी ३ मेच्या रात्री गुन्हा दाखल केला आहे. शाईन शेख भाईंदर पूर्वेच्या स्टील कंपनीत कामाला जातात. नेहमी प्रमाणे ३ मेच्या सायंकाळी काम आटोपून घरी जाण्यासाठी महापालिका मुख्यालयासमोरील बस स्थानकावर बस पकडण्यासाठी त्या थांबल्या होत्या. त्या वेळी फैज गडकरी तेथे आला आणि त्याच्यावर केलेली केस मागे घेण्यासाठी शाईन यांना शिवीगाळ सुरू केली. केस मागे घेतली नाही, तर लैंगिक अत्याचार करण्याची धमकीही त्याने दिल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे.

# घरातून दागिने चोरले



मीरा रोड : भाईंदरच्या उत्तन करईपाडा येथील निलोफर खान यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व पैंजण फ्रिजवर नमाज पढण्याच्या चटईखाली ठेवले होते. अनोळखी ३ जणांनी स्लायडिंग खिडकीतून घरात शिरून फ्रिजवरील चटईखाली ठेवलेले ३१ हजारांचे दागिने चोरून नेले. याप्रकरणी उत्तन सागरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner


लोकसत्ता पू. पान क्र.५

दि. 05/05/2023

# वसई किल्ल्याचा २८५ वा विजयोत्सव

## आजपासून तीन दिवस विविध कार्यक्रम

लोकसत्ता प्रतिनिधी



**वसई :** ऐतिहासिक वसई किल्ल्याचा २८५ वा विजयोत्सव ५ मे ते ७ मे दरम्यान मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. वसई-विरार महापालिका आणि वसई विजय स्मारक समिती, वसई तालुका कला क्रीडा मंडळ यांच्यातर्फे या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

वसई किल्ल्याच्या विजयोत्सवानिमित्त बालजत्रा, पारंपरिक खाद्य महोत्सव, किल्ले बांधणी, रांगोळी, शिवकालीन शिवराई नाणी, ऐतिहासिक वस्तू व दस्तऐवज, शस्त्र प्रदर्शन व 'अराउंड द वर्ड लाइट शो' असे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

याशिवाय ५ मे रोजी श्री वज्रेश्वरी योगिनीदेवी मंदिर ते वसई किल्ला स्मारक मशाल यात्रा काढण्यात येणार आहे. त्यात लेझीम, ढोल पथक व ऐतिहासिक विषयांवर वैयक्तिक वेशभूषा स्पर्धा हे मशाल यात्रेचे मुख्य आकर्षण असणार आहे. तर, ६ मे रोजी भारतीय स्वातंत्र्याची संगीतमय गाथा हा सांस्कृतिक कार्यक्रम, ७ मे रोजी इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत यांच्या सोबत जंजिरे वसई किल्ला सफर व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. श्री भार्गव शेलार शिवगर्जना तालीम यांच्यातर्फे मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक, सांस्कृतिक कार्यक्रम, असे विविध कार्यक्रम या विजयोत्सवात सादर होणार आहे. या सोहळ्यात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पालिकेतर्फे करण्यात आले आहे.

लोकसत्ता पू. पान क्र.१

# डॉक्टर सुट्टीवर असल्यामुळे पोलीस उमेदवारांची मोठी गैरसोय

**भाईंदर :** पोलीस आयुक्तालयाच्या भरती प्रक्रियेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना शासकीय रुग्णालयात वैद्यकीय चाचणीचे प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत आहे. रुग्णालयातील डॉक्टर सुट्टीवर गेल्यामुळे हे प्रमाणपत्र मिळण्यासाठी हा विलंब होत आहे.

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस शिपाई आणि चालक पदाच्या एकूण ९९६ जागांसाठी जानेवारी महिन्यांपासून भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. भरती परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना आपली कागदपत्रे सादर करण्यापूर्वी वैद्यकीय चाचणीचे प्रमाणपत्र मिळवावे लागणार आहे. ही चाचणी भाईंदर पश्चिम येथे असलेल्या पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात होत आहे. उमेदवारांना २ मे ते १५ मे पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. परंतु ही तपासणी करत असताना आवश्यक असलेले फिजिशियन डॉक्टर सुट्टीवर गेले आहेत. डॉक्टरांमार्फत तपासणी झाल्याशिवाय रुग्णालयाकडून प्रमाणपत्र दिले जात नाही आहे. तर डॉक्टर हे ९ मे पासून येणार असल्यामुळे उमेदवारांना त्यावेळी येण्याचा सल्ला दिला जात आहे. याचा गंभीर परिणाम लांबच्या जिल्ह्यातून येणाऱ्या उमेदवारांना सोसावा लागत आहे. दरम्यान, याबाबत अद्यापही कोणतीही तक्रार आलेली नाही. परंतु असे असल्यास याची माहिती घेऊन योग्य तो तोडगा काढण्याचा आम्ही प्रयत्न करू, असे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी सांगितले.

# उमेळा फाटा ते उमेळा स्मशानभूमी रस्ता वाहतुकीसाठी महिनाभर बंद

लोकसत्ता प्रतिनिधी



**वसई:** नायगाव पश्चिमेच्या उमेळा स्मशानभूमीजवळ उघाडी बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे महिनाभर उमेळा फाटा ते उमेळा स्मशानभूमी हा रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

नायगाव पश्चिमेच्या उमेळा फाटा येथून वसईच्या भागात ये जा करण्यासाठीचा मुख्य रस्ता गेला आहे. या रस्त्यावरील उमेळा स्मशानभूमीजवळ खाडी असल्याने त्या ठिकाणी उघाडी तयार करण्यात आली होती. ही उघाडी अनेक वर्षे जुनी असल्याने जीर्ण झाली होती. पावसाळ्यात पाणी वाहून जाण्यासाही अडचणी निर्माण होऊ नये व वाहतुकीलासुद्धा कोणती अडचण येऊ नये यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ही उघाडी नव्याने बांधण्यास सुरुवात केली आहे. गुरुवारपासून सार्वजनिक बांधकाम विभागाने या उघाडीच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात केली आहे. त्यामुळे उमेळा फाटा ते उमेळा स्मशानभूमी हा रस्ता वाहतुकीसाठी संपूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. जवळपास महिनाभर हा रस्ता वाहतुकीसाठी बंद राहणार असून नागरिकांना पर्यायी रस्ता उमेळमान गाव आणि पापडी- नायगाव स्थानक या रस्त्याचा वापर करावा लागणार आहे. नागरिकांनी उपलब्ध असलेल्या पर्यायी रस्त्याचा वापर करून सहकार्य करावे असे आवाहन ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पू.पान क्र.1 दि. 05/05/2023

# नोकरभरतीमध्ये स्थानिक कर्मचाऱ्यांना प्राधान्य द्या

## उच्च न्यायालयात आणखी एक याचिका

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेत होणाऱ्या नोकरभरती प्रक्रियेमध्ये स्थानिक कर्मचाऱ्यांना प्राधान्य द्या अशी मागणी जोर धरू लागली आहे. या मागणीसाठी स्थानिक कामगार संघटनेनेही मुंबई उच्च न्यायालयात प्राधिलेख याचिका (रिट पिटीशन) दाखल केली आहे.

महापालिकेच्या 'क' आणि 'ड' वर्गातील एक हजार २८ जागांसाठी भरती केली जाणार आहे. भरती प्रक्रियेचे काम टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या खासगी कंपनीकडे देण्यात आले आहे. स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार नसल्याचे तसेच कार्यरत ठेका कर्मचाऱ्यांना सामावून घेतले जाणार नसल्याने या नोकरभरतीला जोरदार विरोध होत आहे. याविरोधात स्थानिक कामगार संघटनेने मुंबई उच्च न्यायालयात प्राधिलेक याचिका दाखल केली आहे. यासाठी अमरावती, परभणी आणि नवी मुंबई महापालिकेतील स्थानिकांना भरती प्रक्रियेत समावून घेण्याच्या निर्णयाचा संदर्भ देण्यात आला आहे. ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी शासनाने पदभरती निर्बंध शिथिल केले होते याकडेही या याचिकेद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे. ७ नोव्हेंबर २२ रोजी अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर यांनी ठेका कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेण्याची मागणी केली होती. सध्या अडीच हजार कर्मचारी हे पालिकेच्या सेवेत कंत्राटी पध्दतीने काम करत आहेत. करोना काळातही या कर्मचाऱ्यांनी काम केले. त्यांच्यावर अन्याय आहे, असे स्थानिक कामगार संघटनेचे समन्वयक हार्दिक राऊत यांनी सांगितले.

### ९ जून रोजी सुनावणी

स्थानिकांना नोकरभरतीत समावून घ्या या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कामगार युनियनने दाखल केलेल्या याचिकेवर पुढील सुनावणी ९ जून रोजी होणार आहे. या संदर्भात दाखल सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी होण्याची शक्यता आहे.

### इतर महापालिकांत स्थिती काय ?

२७ जुलै २०२१ रोजी नवी मुंबई महापालिकेत अस्थायी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेण्यात आले होते. १ फेब्रुवारी २०२२ रोजी अमरावती महापालिकेने स्वास्थ्य निरीक्षक पदावर ठेका कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. २० एप्रिल २०२२ रोजी शासनाने परभणी महापालिकेत ठेका कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेण्याचा निर्णय दिला होता. त्यामुळे पालिकेत वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घ्या, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

# पाणीटंचाईत गळतीची भर

## दररोज १५ टक्के गळती, लाखो लिटर पाणी वाया

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरात भीषण पाणीटंचाई निर्माण झालेली असताना दुसरीकडे ठिकठिकाणी असलेल्या गळतीमुळे दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे. पालिकेने १५ टक्के पाणी गळती होत असल्याचे सांगितले असले तरी प्रत्यक्षात हे प्रमाण जास्त आहे.

वसई, विरार शहराला सूर्या प्रकल्पाच्या दोन्ही टप्प्यातून २३० दशलक्ष लिटर, पेल्हार धरणातून १० आणि उसगाव धरणातून २० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत आहे. शहराला ३२६ दशलक्ष लिटर पाण्याची गरज असताना केवळ २२० दशलक्ष लिटर पाणी मिळते. त्यामुळे नागरिकांना केवळ १९० दशलक्ष लिटर पाणी मिळते. दररोज ४३ दशलक्ष लिटर पाणी कमी असल्याने नागरिकांना उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईच्या समस्यांचा सामना करावा लागतो. संतोषभुवन, वलाई पाडा, तुळिंज, वसंत नगरी, वसई पूर्व, नवघर, बिलाल पाडा, विरार पूर्वेतील कोपरी गाव नाका याठिकाणी जुन्या जलवाहिन्यांना मोठ्या प्रमाणात गळती लागली आहे. आधीच पाणीटंचाईच्या झळा त्यात गळती होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहे. पालिकेने केवळ १५ टक्के पाणी गळती होत असल्याचा दावा केला आहे. मात्र हे प्रमाण २० टक्क्यांहून अधिक आहे. यामुळे पालिकेला वर्षाला सुमारे १० ते १२ कोटींचा आर्थिक फटका बसत असतो. शहरात शंभरहून अधिक ठिकाणी पाणी गळती होत असून प्रभाग समितीकडे तक्रार देऊनही त्याची दुरुस्ती केली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. एकीकडे नागरिक पाण्यासाठी तरसत असताना दुसरीकडे रस्त्यावर पाणी वाया जात असल्याचे चित्र शहरात दिसत आहे.

### महापालिकेचे प्रयत्न



पाण्याच्या गळतीचे १५ टक्के प्रमाण हे गृहीत धरले जाते. पाणी शुद्धीकरण प्रकल्पात २०० दशलक्ष लिटर पाण्याचे शुद्धीकरण होताना दररोज पाच ते सहा टक्के पाणी वाया जाते. याशिवाय जलवाहिनीतून ते जलकुंभापर्यंत आणि नागरिकांपर्यंत पोहोचेपर्यंत गळती होत असते. जलवाहिन्या जुन्या असल्याने पाण्याची गळती मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे पालिकेने सांगितले. प्रभाग समतीमधील वॉलमन तसेच पाणी विभागातील अभियंत्यांकडून गळती होत असेल्या ठिकाणांचा शोध घेतला जातो तसेच नागरिकांच्या तक्रारी आल्यानंतर लगेच दुरुस्ती केली जाते, असे पालिकेचे म्हणणे आहे. शहरातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी वसई- विरार महालिकेने आगामी ३० वर्षाचा कृती आराखडा तयार केला आहे. त्याच्या पहिल्या टप्प्यातील ४९४ कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा प्रकल्पास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. लवकर एमएमआरडीकडून १६५ दशलक्ष लिटर पाणी येणार आहे. याशिवाय खोलसापाडा आणि देहर्जी प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. हे पाणी आणताना त्याची गळती कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यासाठी जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलणे, २ ते ३ इंच व्यासाच्या पीव्हीसी जलवाहिन्या बदलणे आदींचा समावेश आहे. यामुळे पाणी गळतीचे प्रमाण कमी होऊन नागरिकांना अधिकाधिक पाणी उपलब्ध होईल, असे पाणी पुरवठा अधिकाऱ्यांनी सांगितले.

Scanned with CamScanner

दि. 05/05/2023

म.टा. पान क्र.10

# आरक्षणावरून हिंसा

## मणिपूरमध्ये दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश; लष्कर तैनात

वृत्तसंस्था, इम्फाळ



मणिपूरमध्ये ५३ टक्के लोकसंख्या असलेल्या मैतेई समाजाला अनुसूचित जमातीचे (एसटी) आरक्षण लागू करण्याच्या हालचालींच्या विरोधात हिंसाचार उफाळला आहे. आदिवासी समाज आणि बहुसंख्य मैतेई समाजामध्ये हिंसक चकमक उडत असल्याने दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.

मैतेई समाजाला अनुसूचित जमातींचे आरक्षण देण्याच्या मागणीप्रकरणी केंद्र सरकारने शिफारशी सादर कराव्यात, असा आदेश मणिपूर उच्च न्यायालयाने दिला आहे. याविरोधात बुधवारी राज्यातील नागा व कुकी या आदिवासी समाजाच्या नागरिकांनी मोर्चा काढला. ४० टक्के लोकसंख्या असलेल्या आदिवासी समाजाचे नागरिक यामध्ये सहभागी झाले होते. ऑल ट्रायबल स्टुडंट युनियनने राज्याच्या दहा जिल्ह्यांमध्ये काढलेल्या या मोर्चाला हिंसक वळण लागले. आंदोलकांनी मैतेई समाजाच्या काही नागरिकांवर हल्ला केल्याने भडका उडाला व एकमेकांच्या वस्त्यांना लक्ष्य करण्यात आले. घरे, दुकाने, प्रार्थनास्थळांची जाळपोळ व तोडफोड झाल्याने सुमारे ९ हजार नागरिकांनी निवारा गमावला आहे. त्यापैकी पाच हजार नागरिकांना सुरक्षित निवाऱ्यामध्ये हलवण्यात आले असून, दोन हजार जणांना इम्फाळ तर आणखी दोन हजार नागरिकांना तेनुगोपाल जिल्ह्यातील सीमाभागात हलवण्यात आले आहे. हिंसक परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी गरज भासल्यास दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे अधिकार राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. यासाठी राज्याच्या गृह विभागाच्या आयुक्तांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३नुसार गुरुवारी आदेश जारी केले. लष्कर व आसाम रायफल्सच्या जवानांनी चुराचंदपूर जिल्ह्यातील अनेक भागांत गुरुवारी ध्वजसंचलन करून आपल्या सज्जतेचा दाखला दिला. राज्यातील परिस्थिती स्फोटक बनल्याने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली.

### आरक्षणाचा मुद्दा काय?

राज्यातील मैतेई समाजाची लोकसंख्या ५३ टक्के तर, आदिवासींची लोकसंख्या ४० टक्के आहे. मैतेई समाजाचे सर्वाधिक वास्तव्य असलेल्या पूर्वाश्रमीच्या संस्थानिक क्षेत्रामधील नागरिकांसमोर म्यानमार व बांगलादेशातून बेकायदा स्थायिक झालेल्या नागरिकांच्या लोंढ्यामुळे उदरनिर्वाहाची समस्या निर्माण झाली आहे. मणिपूरच्या विधिमंडळ प्रतिनिधींनी अलीकडेच मैतेई जमातीच्या नागरिकांना आरक्षण देण्यास समर्थन दिले होते. मात्र त्यामुळेच आदिवासी समाजामध्ये असुरक्षिततेची व एकटेपणाची भावना निर्माण झाली आहे. यातूनच हा संघर्ष उफाळला आहे.

### काँग्रेसचे भाजपवर टीकास्त्र

'राज्यातील सत्ताधारी भाजपने समाजांमध्ये वैरभाव निर्माण करून एका सुंदर राज्यातील शांततेला नख लावले आहे. भाजपचे द्वेष व फुटीचे राजकारण आणि सत्तेची हाव याचाच हा परिपाक आहे', अशी टीका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली. 'मणिपूरमध्ये खालावत जाणारी कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चिंताजनक आहे. पंतप्रधानांनी राज्यात शांतता निर्माण होण्याकडे लक्ष केंद्रीत करायला हवे', असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. तर, काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी व्हिडीओ संदेश प्रसिद्ध केला आहे. '२०२१मध्ये भाजपला राज्यात बहुमत प्राप्त झाले आणि या डबल इंजिन सरकारने केवळ १५ महिन्यांत संपूर्ण राज्याला आगीत लोटले. मणिपूरमधील विविधतापूर्ण समाज असमाधानी आहे. तरुण, आदिवासी, बिगरआदिवासी समाज नाराज आहे. हा लोकांच्या मतांचा घात आहे', असे रमेश यांनी म्हटले आहे.

### लष्कर, आसाम रायफल्सची कुमक

हिंसाचार रोखण्यासाठी लष्कर व आसाम रायफल्सच्या ५५ तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. याशिवाय लष्कराने आणखी १४ तुकड्या सज्ज ठेवल्या आहेत. दंगल आटोक्यात आणण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने शीघ्र कृती दलाचे जवानही धाडले आहेत. ही कुमक गुरुवारी सकाळी हवाईमार्गे राजधानी इम्फाळमध्ये पोहोचली.

---

सकाळ पान क्र.8

## 'केरळ स्टोरी'चा मार्ग मोकळा

नवी दिल्ली, ता. ४ : बहुचर्चित 'द केरळ स्टोरी' हा चित्रपट प्रदर्शित होण्याचा मार्ग मोकळा झाला असून सेन्सॉर बोर्डाकडून या चित्रपटाला देण्यात आलेल्या प्रमाणपत्राला आक्षेप घेणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यात यावी म्हणून केरळ उच्च न्यायालयाला निर्देश देण्यात यावेत अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळून लावली. हा चित्रपट शुक्रवारी (ता.५) रोजी प्रदर्शित होणार आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने हे निर्देश दिले.

Scanned with CamScanner

लोकमत

# ५ ते ७ मे दरम्यान रंगणार २८५ वा वसई विजयोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई-विरार महापालिका आयोजित वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ व वसई विजय स्मारक समिती यांच्या सहकार्याने २८५ वा वसई विजयोत्सव जंजिरे वसई किल्ला, वसई गाव येथे ५ ते ७ मे या कालावधीत साजरा केला जात आहे. विजयोत्सव कालावधीत संध्याकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत बालजत्रा, पारंपरिक खाद्य महोत्सव, किल्ले बांधणी, रांगोळी, शिवकालीन शिवराई नाणी, ऐतिहासिक वस्तू व दस्तऐवज, शस्त्रप्रदर्शन व अराऊंड द वर्ड लाईट शो आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

वसई विजयोत्सव कार्यक्रमांतर्गत शुक्रवार दुपारी ३ वाजता श्री वज्रेश्वरी योगीनीदेवी मंदिर ते वसई किल्ला स्मारक मशाल यात्रा प्रारंभ होईल. लेझीम, ढोलपथक व ऐतिहासिक विषयावर वैयक्तिक वेशभूषा स्पर्धा हे मशाल यात्रेचे मुख्य आकर्षण राहणार आहे. सायंकाळी साडेसहा वाजता मान्यवरांच्या हस्ते श्रीमंत नरवीर चिमाजी अप्पा अश्वारूढ पुतळ्याचे पूजन व पुष्पहार अर्पण केले जाईल. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता 'दर्याचा राजा' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवारी रात्री ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. २८५ वा वसई विजयोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमांना विनामूल्य प्रवेश असून नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन मनपाने केले आहे.

## सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

शनिवारी सायंकाळी ७ वाजता भारतीय स्वातंत्र्याची संगीतमय गाथा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी ७ ते सकाळी १० वाजता इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत सोबत जंजिरे वसई किल्ला सफर व मार्गदर्शनपर भटकंती कार्यक्रम होईल.

Hello Vasai
Page No. 1 May 05, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

दैनिक दबंग दुनिया
मूल्य ₹ 5.00

## एम. बी. वि. वी. कमिश्नरेट के लिये खुश खबर

# कमिश्नरी में मैनपावर की कमी को कुछ हद तक पूरा किया जाएगा

## कमिश्नरेट को 996 नए कर्मचारी मिले

नाज लोपेज » वसई

मीरा-भाईंदर, वसई विरार पुलिस आयुक्तालय की सीमा में पुलिस कांस्टेबल और चालक के पदों के लिए सीधी भर्ती प्रक्रिया 02 जनवरी से शुरू की गई थी।वसई-विरार पुलिस आयुक्तालय के मीरा-भाईंदर के पुलिस बल में लड़के और लड़कियों के शारीरिक परीक्षण और लिखित परीक्षा के बाद 996 नए कर्मियों की भर्ती की गई है।इनमें 986 पुलिस आरक्षक और 10 वाहन चालक हैं।

### कुछ हद तक पूरा किया

नए स्टाफ की भर्ती से कमिश्नरी में स्टाफ की कमी को कुछ हद तक पूरा किया गया है,भर्ती प्रक्रिया में उत्तीर्ण होने वाले अभ्यर्थियों में पुरुष वर्ग में प्रफुल्ल पोपट डुबल और महिला वर्ग में शुभांगी काशीनाथ लंगोटे ने प्रथम स्थान प्राप्त किया है.फिजिकल टेस्ट और लिखित परीक्षा संयुक्त रूप से 150 अंकों में से पुरुष और महिला ने क्रमश:135 अंक और 127 अंक हासिल किए हैं।

### 12 हजार अभ्यर्थियों ने परीक्षा में क्वालीफाई




मीरा भायंदर वसई विरार पुलिस कमिश्नरेट में पुलिस कांस्टेबल और चालक के पदों पर सीधी भर्ती प्रक्रिया 02 जनवरी से शुरू की गई थी. लड़के और लड़कियों का फिजिकल टेस्ट कराने के बाद 12 हजार अभ्यर्थियों ने लिखित परीक्षा में क्वालीफाई किया,पुलिस आयुक्तालय की स्थापना के बाद पहली बार सीधी भर्ती की जा रही है।यह भर्ती 996 पदों पर की गई है। इन पदों पर करीब 71 हजार आवेदन मिले थे।प्राप्त 71 हजार 951 आवेदनों में 59 हजार 847 पुरुष और 12 हजार 104 महिला अभ्यर्थी हैं।

कुल 12,127 योग्य उम्मीदवार थे- पात्र आवेदकों में से कुल 49,479 अभ्यर्थियों ने फील्ड फिजिकल टेस्ट पूरा किया था, जो भर्ती प्रक्रिया में उनकी उपस्थिति दशार्ता है।फील्ड फिजिकल टेस्ट में 35,956 कैंडिडेट्स क्वालीफाई हुए जबकि फिजिकल टेस्ट में 13,523 कैंडिडेट्स डिसक्वालिफाई हुए।महाराष्ट्र पुलिस भर्ती 2021 के तहत योग्य उम्मीदवारों की लिखित परीक्षा 02 अप्रैल को कार्यालय पुलिस आयुक्तालय, वसई विरार, मीरा-भाईंदर के माध्यम से आयोजित की गई थी। लिखित परीक्षा के लिए कुल 12,127 योग्य उम्मीदवार थे।

### दो हजार योग्य उम्मीदवार परीक्षा से अनुपस्थित

लेकिन भर्ती के लिए 8,858 पुरुषों में से 7,721 लिखित परीक्षा में शामिल हुए, जबकि महिलाओं के लिए 3,269 में से 2,278 लिखित परीक्षा में शामिल हुए. लगभग दो हजार योग्य उम्मीदवार लिखित परीक्षा से अनुपस्थित रहे,996 लोगों ने शारीरिक परीक्षा और लिखित परीक्षा पास कर पुलिसकर्मियों के रूप में अपना भाग्य चमकाया है.शेष दस्तावेजों का सत्यापन एवं अन्य मामले चल रहे हैं और जल्द ही योग्य उम्मीदवारों को प्रशिक्षण के लिए भेजा जाएगा.

Scanned with CamScanner